**कृपया प्रसिध्दिसाठी** **5 जून 2009**

**लोकसभेतील पराभवाचा बदला विधानसभेत घेऊ : विनोद तावडे**

**मुंबई, शुक्रवार:** "लोकसभा निवडणुकीतील पराभव हे वास्तव असले, तरी या पराभवाने हताश होण्याचे कारण नाही. या निकालाने जनतेने ना पूर्णतः भाजपाला नाकारले, ना काँग्रेसला संपूर्ण विजय दिला. काँग्रेसला सत्तेसाठी अन्य पक्षांची भरपूर मदत लागली हे लक्षात ठेवून आपण पुन्हा जोमाने पुढे जाऊया. विधानसभा निवडणुकीत या पराभवाचा बदला घेऊया," अशा शब्दात भाजपा, महाराष्ट्राचे सरचिटणीस आणि आमदार श्री. विनोद तावडे यांनी उत्तर मुंबईतील भाजपा-शिवसेना कार्यकर्त्यांना आवाहन केले. लोकसभा निवडणूक निकालानंतर युतीच्या कार्यकर्त्यांसाठी आयोजित श्रमपरिहार संमेलनात श्री. तावडे बोलत होते.

लोकसभा निवडणुकीची दिवस-रात्र मेहनत करणा-या शेकडो कार्यकर्त्यांचे आभार मानत उमेदवार श्री. राम नाईक म्हणाले," सर्वच कार्यकर्त्यांनी दिवस-रात्र मेहनत केली. जनतेनेही भरपूर मते दिली. तरीही थोडक्या मतांनी आपला पराभव झाला. कारण आपला अंदाज चुकला. काँग्रेसला हरवण्याचा आवेश धारण करुन मैदानात उतरलेल्या ‘मनसे’मुळे प्रत्यक्षात काँग्रेसचा विजय झाला. आपण या परिस्थितीचे चिंतन करुन नवी रणनीति ठरविण्याची गरज आहे." कार्यकर्त्यांपर्यंत आपल्या भावना पोचविताना श्री. अटलबिहारी वाजपेयी यांची कविता उद्धृत करीत श्री. राम नाईक म्हणाले,

**"भरी दुपहारी में अंधियारा............**
**सूर्य आपल्याच सावलीने झाकोळला,भर दुपारी अंध:कार पसरला**
**अंतर्मनातील स्नेहाने विझलेली वात उजळू**
**चला ! पुन्हा दीप लावू ! चला कामाला लागू !"**

भाजपा - मुंबईचे अध्यक्ष व बोरीवलीचे आमदार श्री. गोपाळ शेट्टी यावेळी म्हणाले, " विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत. त्यावेळीही हीच आव्हाने पुढे उभी राहाणार आहेत. त्यांचा सामना करण्यासाठी आपण सर्वशक्तिनिशी उभे राहिले पाहिजे." शिवसेनेचे विभागप्रमुख श्री. विनोद घोसाळकर यावेळी निर्धार व्यक्त करीत म्हणाले,"भाजपा-शिवसेना युतीच्या कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करुन उत्तर मुंबईत पुन्हा आपले वर्चस्व निर्माण करायचे आहे."

भाजपा उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. योगेश सागर, मुंबईचे उपमहापौर श्री. विनोद घेडिया, आदींचीही यावेळी भाषणे झाली. भाजपा-महाराष्ट्राचे उपाध्यक्ष श्री. विजयभाई गिरकर, भाजपा-मुंबईचे सरचिटणीस श्री. अतुल भातखळकर, बोरीवली प्रभाग समितीचे अध्यक्ष श्री. भालचंद्र म्हात्रे, कांदिवली प्रभाग समितीचे अध्यक्ष श्री. शिवकुमार झा, माजी उपमहापौर श्री. रमेश मेढेकर, आदी यावेळी उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन श्री. विनोद शेलार यांनी केले, तर नगरसेवक श्री. मोहन मिठबावकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**(कार्यालय सचिव)**